



अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । गुरुवार, दि. ११ एप्रिल २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : १९२ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२



## दुहेरी हत्याकांडाने नांदणी हादरले!

### पत्नी आणि तिच्या प्रियकराचा कुऱ्हाडीने वार करुन खून

पान ३ वर

# रणजितदादा भाजपाचा आणि आमदारकीचाही देणार राजीनामा

## पवारांकडून माढ्यात भाजपाचा गेम! अखखा मोहिते-पाटील परिवार 'भाजपामुक्त'!



✔ विशेष प्रतिनिधी/अकलूज

**राजकारण कोळून प्यायलेल्या शरद पवारांनी माढ्यात भाजपाचा 'गेम' केलाय! धैर्यशील मोहिते-पाटील यांचा पक्षप्रवेश आणि त्यांच्या उमेदवारीचे पत्ते खोलण्याआधी अखखाच्या अखखा मोहिते-पाटील परिवार भाजपामुक्त करुन राष्ट्रवादीत आणण्याचा डाव त्यांनी साधलाय! मोहिते-पाटील यांची बंडखोरी आणि माढ्याच्या उमेदवारीचा निर्णय यातील एक 'नाजूक बंध' जो शरद पवार यांच्यासाठी धोक्याचा आणि मोहिते-पाटलांसाठी अडचणीचा ठरत होता. त्याचा 'बंदोबस्त' झाला असून भाजपाचे विधानपरिषद सदस्य रणजितसिंह मोहिते-पाटील यांना भारतीय जनता पक्षाचा राजीनामा देऊन कुटुंबासमवेत राहण्याचा निर्णय घ्यावा लागल्याचे खळबळजनक परंतु विश्वासार्ह वृत्त 'सुराज्य'च्या हाती आले आहे.**



माढा लोकसभा मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाने विद्यमान खासदार रणजीसिंह नाईक-निंबाळकर यांची उमेदवारी जाहीर केल्यापासून माढा मतदारसंघ ढवळून निघाला आहे. माढ्याची चर्चा राज्यभर सुरु असली तरी केंद्रबिंदू अकलूजचे 'शिवरत्न' बनले आहे. भाजपाचे शिष्टाईचे प्रयत्न असफल झाल्यानंतर कार्यकर्त्यांकडून मोहिते-पाटील परिवारावर 'तुतारी' फुंकण्याचा दबाव वाढत गेला आणि मोहिते-पाटील परिवारातील ज्येष्ठ सदस्य जयसिंह उर्फ बाळदादा मोहिते-पाटील यांनी माध्यमांसमोर अक्षरश: 'तुतारी फुंकून' हम तैय्यार है चा नारा दिला. त्यानंतर दररोज नवीन मोहिम, नवीन तारखा, परिवारातील इतर सदस्यांचे मौन यामुळे केवळ कार्यकर्तेच नव्हे तर प्रसारमाध्यमेही गोंधळून गेली.

### विलंब कशामुळे?

वास्तविक, मोहिते-पाटलांचे बंड प्रारंभीच थोडे शिथील झाले होते. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जानकर यांची उमेदवारी सूचित करत मोहिते-पाटलांच्या या बंडातील हवा काढून घेतली होती. मोहिते-पाटील परिवारही या दरम्यान हतबल झालेला! त्यांना टोकाचा निर्णय घेता येईना! दरम्यान, महादेव जानकरांचा टांगा एका रात्रीत पलटी झाला, माढ्याची समीकरणे बदलली, मोहिते-पाटील परिवारासाठी तो 'पुर्नजन्म' ठरला! शरद पवारांना माढ्यात तगडा उमेदवार मिळवणे हे आव्हान बनले होते आणि मोहिते-पाटलांना तुतारी हाती घेण्याशिवाय अन्य पर्याय नव्हता. दोघांनाही एकमेकांची साथ गरजेची होती पण राजकारणात मुरलेल्या पवारांनी या संधीचं सोनं करायचं ठरवलं! त्यांनी मोहिते-पाटलांसाठी जाळ विणलं...फेकलं सुद्धा! पण स्वत: या साऱ्या घडामोडींपासून अलिप्त असल्याचे भासवत कधी संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष प्रवीण गायकवाड तर कधी सांगोल्याचे देशमुख तर कधी फलटणचे निंबाळकर यांचे पत्ते पिसण्याचे आणि फेकण्याचे काम जाहीररित्या करवून घेतले.

या दरम्यान, त्यांचा आतून मोहिते-पाटलांची संपर्क होता पण कधीही आपली 'गरज' न दाखवता त्यांनी अटी-शर्थीच्या माध्यमातून मोहिते-पाटलांना बांधून घेण्याचा कार्यक्रम सुरु ठेवला. 'तुतारी' हाती घेण्यापूर्वी मोहिते-पाटील आणि त्यांच्या समर्थकांनी भाजपाच्या आपआपल्या पदांचा राजीनामा द्यावा, ही पवारांची अट तात्काळ मान्य होण्यासारखी होती. परंतु 'दुसरी अट' अडचणीची!

भाजपाचे विद्यमान आमदार रणजीतसिंह मोहिते-पाटील यांच्यासह संपूर्ण मोहिते-पाटील परिवार भाजपाचा त्याग करुन येणार असेल तरच राष्ट्रवादीत प्रवेश मिळेल, 'विजयदादा इकडे तर प्रतापसिंह दुसरीकडे' असा जुना फॉर्म्युला नको, अशी ही दुसरी अट होती. मोहिते-पाटलांच्या बंडखोरीला पहिल्या दिवसापासून रणजीतदादांचा विरोध होता. वसंतदादा पाटील यांच्यानंतर मोहिते-पाटील परिवाराला बळ कोणी दिले असेल तर देवेंद्र फडणवीस यांनीच! असे ठणकावून सांगत हे बंड शांत करण्याचा प्रयत्न रणजीतदादांनी केला. परंतु माघार घेण्याची मानसिकता ना बाळदादांची होती, ना धैर्यशीलभैय्याची, ना समर्थकांची! त्यामुळे रणजीतसिंह मोहिते-पाटलांची प्रचंड कोंडी झाली. ज्यांनी मदत केली, आमदारकी दिली त्या भाजपासोबत रहायचे की ज्यांनी घडवलं, माया, प्रेम, आधार दिला त्या परिवारासोबत रहायचं? महाभारतात कर्तव्य श्रेष्ठ आणि नाती गौण होती. परंतु माढ्याच्या महाभारतात 'कुटुंब' जिंकलं! त्यामुळे रणजीतसिंहांनी कुटुंबासाठी आमदारकीचं आणि पक्षनिष्ठेचं बलिदान देण्याचा निर्णय अखेर घेतला. हा निर्णय शरद पवारांचा कानावार घालण्यात आला आणि त्यानंत पवारांनी माढ्यातील धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या पक्षप्रवेशाचा आणि उमेदवारीचा 'मुहूर्त' मंजूर केला.

बहुचर्चित अकलूजकर मोहिते-पाटील यांच्या राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष प्रवेशासाठी १३ एप्रिलचा मुहूर्त काढण्यात आल्याची नवीन माहिती समोर आली आहे. धैर्यशील मोहिते-पाटील यांचा या दिवशी वाढदिवस आहे. माढा लोकसभेच्या उमेदवारीची गिफ्ट त्यांना देण्याच्या पार्श्वभूमीवर, हा मुहूर्त साधण्याचा योग जुळवून आणला जाणार आहे. शिवाय १६ तारखेच्या दूर्गाष्टमीच्या शुभ मुहूर्तावर धैर्यशील मोहिते-पाटील यांचा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटातर्फे मोठ्या शक्ती प्रदर्शनानं सोलापुरात उमेदवारी अर्ज दाखल करण्यात येणार आहे. दरम्यान, उमेदवारी अर्ज भरण्याला ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यासह त्यांच्या पक्षामधील नेतेमंडळींचं वऱ्हाड सोलापुरात येणार आहे. आज पुण्यात यासंबंधीचा निर्णय शरद पवार यांच्याशी चर्चा करुनच झाल्याचं त्यांचे निकटवर्तीय आणि मोहिते-पाटील यांचे काही खास समर्थक यांनी सांगितलं. उल्लेखनीय बाब म्हणजे लोकसभा निवडणुकीच्या ऐन मोक्यावर मोहिते-पाटील हे भाजप विरोद्धात बंडाचे निशान फडकवणार आहेत. त्यांच्या या निर्णयानं या पक्षाला धक्का बसणार आहे. मोहिते-पाटील यांच्या बंडाची माढा लोकसभेसह पश्चिम महाराष्ट्रात भाजपला ताकद मोजावी लागेल, असे मानण्यात येत आहे.

### शंकरनगरमधील क्रीडा संकुलावर पक्षप्रवेश

शंकरनगर इथल्या विजयसिंह मोहिते-पाटील क्रीडा संकुलावर ज्येष्ठ नेते विजयसिंह मोहिते-पाटील, जयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शरद पवार यांच्या उपस्थित पक्ष प्रवेशाचे फटाके फुटणार आहेत. शिवाय माढा लोकसभा मतदार संघातून निवडणूक लढविण्याच्या निर्णयाच्यादेखील तुताऱ्या फुंकल्या जाणार आहेत. मोहिते-पाटील यांच्या राष्ट्रवादीमधील घरवापसी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर, माढा लोकसभा मतदार संघातील मोहिते-पाटील समर्थक तसेच राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट, फलटणचे निंबाळकर आणि त्यांचे समर्थक यांना पाचरण करण्यात येणार आहे. या सोहळ्यातून शरद पवार यांच्यासमोर पर्यायाने भाजपला हिणवण्याच्यादृष्टीने जंगी शक्ती प्रदर्शन करण्याचं नियोजन केलं जाणार असल्याची माहिती मोहिते-पाटील यांच्या अत्यंत निकटवर्तीयांनी दिली.

## सांगा 'आबा' कुणाचे? भाऊंचे की दादांचे?

**माढा लोकसभेचे महायुतीचे उमदेवार विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या प्रचारापासून दूर राहिलेले करमाळ्याचे आमदार नारायण पाटील यांची आज पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी करमाळ्यात त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली. यादरम्यान बंद दाराआड चर्चा झाली.चर्चेचा तपशील मात्र कळू शकला नाही.**

राज्यात भाजप, एकनाथ शिंदे शिवसेना गट आणि अजित पवार गट हे महायुतीच्या माध्यमातून लोकसभेची निवडणूक लढवित आहेत. करमाळ्याचे आमदार नारायण पाटील हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शिवसेना गटात आहेत. महायुतीचा धर्म पाळण्यातून पाटील यांनी भाजप पुरस्कृत उमेदवार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या प्रचारात उतरणे अपेक्षित होते. मात्र अद्याप पाटील यांनी तटस्थपणाची भूमिका घेतल्याचे स्पष्ट होत होते. पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी याच



पार्श्वभूमीवर, आमदार पाटील यांची भेट घेऊन गुप्त चर्चा केली. महायुतीचा धर्म पाळण्यातून खासदार नाईक-निंबाळकर यांचे काम करण्याबद्दल पाटील यांना पालकमंत्र्यांनी सांगितले.आमदार नारायण पाटील यांचे अकलूजकर मोहिते-पाटील यांच्याशी अत्यंत जवळचे संबंध राहिले आहेत. माढा लोकसभा मतदार संघातून धैर्यशील मोहिते-पाटील यांची उमेदवारी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटातून असणार आहे. त्यामुळे आमदार नारायण पाटील हे महायुतीचा धर्म पाळण्यातून भाजपाचे उमेदवार नाईक-निंबाळकर यांचे काम करणार की मोहिते-पाटील यांचे समर्थक म्हणून धैर्यशील मोहिते-पाटील यांचे काम करणार, याबद्दल सध्या तरी मोठी चर्चा या तालुक्यात आहे.

### आबा धर्मसंकटात

अकलूजकर मोहिते-पाटील यांनी करमाळ्याचे आमदार नारायण पाटील यांना आत्तापर्यंत प्रत्येक आघाडीवर ऊर्जा दिली. आमदार पाटील हे मोहिते-पाटील गटाचे मानले जातात. दुसऱ्या बाजूला आमदार पाटील हे एकनाथ शिंदे शिवसेना गटासोबत आहेत. अशा प्राप्त परिस्थितीत महायुतीचा धर्म पाळण्यातून भाजप पुरस्कृत उमेदवार खासदार नाईक-निंबाळकर यांचे काम करायचे की राजकारणात आजवर मोठी मदत केलेल्या मोहिते-पाटील गटाचे काम करायचे? या धर्मसंकटात आमदार पाटील सापडले आहेत.

### धनगरबांधवांची मते वळविण्यासाठी फायदा

आमदार नारायण पाटील हे धनगर समाजाचेदेखील नेतृत्व करतात. या तालुक्यातील धनगर समाजात त्यांची मोठी क्रेझ आहे. या समाजाचे लोकसभा मतदान वळविण्यात त्यांची भूमिका महत्वाची राहणार आहे. मात्र, ते कोणाचे काम करणार हे पाहणेदेखील तितकेच महत्वाचे राहणार आहे. माढा लोकसभेच्या मतदार संघामधील धनगर समाजाचे मतदान लक्षात घेता, ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी त्यांना आपल्या पक्षातून माढ्यातून लढण्याची ऑफर दिली होती.

## लोकशाहीच्या उत्सवाची उद्या सुरुवात

# मंगळवार ठरणार हॉट डे

**सोलापूर आणि माढा लोकसभा मतदारसंघासाठी ७ मे रोजी मतदान होत असून, त्याची रणधुमाळी म्हणजेच प्रत्यक्ष उमदेवारी अर्ज भरण्यास १२ एप्रिलपासून सुरूवात होत आहे. लोकशाहीच्या उत्सवास प्रारंभ होत आहे. उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम मुदत १९ एप्रिलपर्यंत आहे.या कालावधीत तब्बल तीन शासकीय सुट्‌ट्या असल्याने उमेदवारी अर्ज भरण्यासाठी केवळ पाच दिवसांचा कालावधी मिळणार आहे. महायुतीचे खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर आणि आमदार राम सातपुते हे दोन्ही उमेदवार मंगळवार, १६ एप्रिल रोजी आपले उमदेवारी अर्ज भरणार आहेत.**



काँग्रेसच्या उमेदवार आमदार प्रणिती शिंदे यांचा उमेदवारी अर्ज १८ एप्रिलच्या मुहूर्तावर भरण्यात येईल अशी माहिती समोर येत आहे. या दोन्ही दिवशी सोलापुरात महायुती आणि महाविकास आघाडीकडून जोरदार शक्ती प्रदर्शन केले जाणार आहे.

लोकसभा निवडणुकीतील तिसऱ्या टप्प्यात महाराष्ट्रातील ११ जागांसाठी ७ मे रोजी मतदान होणार आहे. यात सोलापूर आणि माढ्याचा समावेश आहे. यासाठी निवडणूक अधिसूचना १२ रोजी जाहीर होणार असून, १९ एप्रिलपर्यंत नामांकन अर्ज दाखल करता येतील. २० एप्रिल रोजी निवडणूक अर्जाची छाननी होणार आहे. उमेदवारांचे नामनिर्देशन दि. १२ ते १९ दरम्यान कार्यालयीन वेळेत सकाळी ११ ते दुपारी ३ पर्यंत सादर करता येणार आहे. या कालावधी १३ (शनिवार) १४ (रविवार) व १७ (राम नवमी) एप्रिल रोजी शासकीय सुट्टी असल्याने नामनिर्देशन पत्रे स्विकारली जाणार नाहीत. नामनिर्देशन पत्र दाखल करताना कार्यालयाच्या १०० मीटर परिसरात फक्त तीन वाहने आणि उमेदवाराबरोबर इतर चार व्यक्तींना प्रवेश दिला जाईल. २२ एप्रिल उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिवस आहे. उमेदवारी मागे घेण्याला एकच दिवसाची मुदत आहे. ७ मे रोजी मतदान होईल, तर मतमोजणी ४ जून रोजी होणार आहे.



### मंगळवार ठरणार 'हॉट डे'

मंगळवारी १६ एप्रिल रोजी भाजपाचे सोलापूरचे उमेदवार आ. राम सातपुते आणि माढ्याचे उमेदवार खा. रणजितसिंह निंबाळकर या दोघांचे उमेदवारी अर्ज भरले जाणार आहेत. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.महायुतीचे पाच आमदारही यावेळी हजर राहणार आहेत. मिरवणूक आणि रॅली काढत दोघे उमेदवार अर्ज दाखल करणार आहेत. अर्ज भरल्यानंतर फडणवीस यांची सभाही होईल. त्यामुळे मंगळवार हॉट डे ठरणार आहे.

### प्रणितींचा अर्ज शुक्रवारी

काँग्रेसच्या उमेदवार आ. प्रणिती शिंदे या शुक्रवार, १८ रोजी अर्ज भरणार आहेत. काँग्रेस भवनपासून मिरवणुकीने त्या जिल्हाधिकारी कार्यालयावर अर्ज दाखल करण्यास जाणार आहेत. यावेळी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यासह शहरातील महाआघाडीचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

### धैर्यशीलभैयांचा १६ तारखेला अर्ज; शरद पवारांच्या दौऱ्याची शक्यता

ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी मंगळवारी १६ तारखेला माढ्याचा दौरा ठेवला आहे. यादरम्यान धैर्यशील मोहिते-पाटील यांचा उमदेवारी अर्ज याच दिवशी भरला जाण्याची शक्यता आहे. आमदार प्रणिती शिंदे आणि धैर्यशील मोहिते-पाटील या दोघांचे उमेदवारी अर्ज एकाच दिवशी भरण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. शरद पवार आणि सुशीलकुमार शिंदे यांच्यासह अन्य श्रेष्ठींच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज भरण्याचे नियोजन असल्याचे आज शरद पवार यांच्या निकटवर्तीयांकडून सांगण्यात आले.

# एमआयएमचा पतंग कटला!

**सोलापूर लोकसभेच्या महासंग्रामात काँग्रेसच्या उमेदवार प्रणिती शिंदे आणि भाजप उमेदवार आमदार राम सातपुते यांच्यात काँटे की टक्कर सुरु आहे. निवडणुकीची चुरस वाढू लागली आहे. प्रचाराचा धूराळा उडू लागलाय. राजकीय गरमी वाढली आहे. या मतदार संघात अत्यंत अटीतटीची लढत लागली असतानाच दुसरीकडं एमआयएममध्ये उमेदवारी देण्यावरुन दूफळी माजली आहे. उमेदवारी देऊ नये म्हणून पदाधिकाऱ्यांनी थेट राजीनाम्याचे अस्त्र बाहेर काढले आहे.**

विशेषत्वे, सोलापूर लोकसभा मतदार संघातील जातीय समीकरण पाहता एमआयएम पक्षाचा उमेदवार दिल्यास भारतीय जनता पक्षाला अप्रत्यक्ष मदत होणार आहे, हे कारण पुढं करत एमआयएमचे जनरल सेक्रेटरी कोमारोव्ह सय्यद, महिला आघाडीच्या अध्यक्षा रेश्मा मुल्ला, वाहतूक संघटनेचे अध्यक्ष रियाज सय्यद, तौसिफ काझी यांनी राजीनामे देत असल्याचे आज पत्रकार परिषदेतून स्पष्ट केले.

### राजीनाम्यांबद्दल सय्यद यांची भूमिका

सोलापूर शहर व जिल्ह्यातील कार्यकर्त्यांना विश्वासात न घेता पक्षाचे अध्यक्ष फारुख शाब्दी आणि निरीक्षक अन्वर सादात यांनी उमेदवार देणार असल्याची घोषणा केली. त्याचबरोबरच अनुसुचित जात प्रवर्गाच्या उमेदवाराची चाचपणी सुरु केली, ही गंभीर बाब असून धर्मनिरपेक्ष विचाराला काळमी फासणारी आहे.

### शाब्दी 'या' आरोपांच्या पिंजऱ्यात

२०१९ मध्ये झालेली लोकसभेची निवडणूक आणि कुठल्याही प्रकारचा सांख्यिकी अभ्यास शिवाय मतदार संघाची जातनिहाय स्थितीचा हे लक्षात न घेता शाब्दी आणि सादात यांची उमेदवारी जाहीर करण्याची भूमिका आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत वंचित बहूजन आघाडीसोबत एमआयएमची आघाडी होती. डॉ. प्रकाश आंबडेकर निवडणुकीच्या आखाड्यात होते. त्यांना एक लाख ७० हजार मतं मिळाली होती. यादरम्यान भाजपाच्या उमेदवारालाच मदत झाली होती. या खेपेसदेखील तोच प्रकार शाब्दी आणि सादात यांच्या निर्णयामुळे होणार आहे.

### रेश्मा मुल्लांचे आरोपाचे तोफगोळे

फारुक शाब्दी यांचा पक्षात मनमानी पद्धतीने कारभार सुरु आहे. लोकसभेला उमेदवार देण्याच्या पार्श्वभूमीवर, पक्षाचे पदाधिकारी आणि समाज यांच्याशी चर्चा केलेली नाही. भाजपला सहकार्य होईल, अशीच भूमिका त्यांची दिसते.